३५५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय
बी.एस.एन.एल. बिल्डिंग, १ ला मजला, शिवाजीनगर
पोस्ट ऑफिस शेजारी, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
झोपुप्रा/सप्रा-२/स.नं.१६०+१५९अ कोथरुड/मा.क्र.१७९५/ ११० /२०१९
दिनांक :- ०४ /०२/२०१९

**"जाहिर नोटिस"**

**( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पुर्वसुचना )**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये महाराष्ट्र शासनाने, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्रं.-२१३/झोपसु-१ दि.३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने उप आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, झो.नि.पु., परिमंडळ क्र.३, पुणे महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्र.८३७३, दि.०२/०२/२०१९ अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेमुळे तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे व तसेच पुणे महानगरपालिकेकडील विकास आराखडा पाहता सदर मिळकत ही स्लम झोन मध्ये समाविष्ट आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

**आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमुर्लन व पुर्नविकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी,कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो, व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबददल त्याची खात्री पटल्यावर, कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे, किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे**

**मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यांनतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील", असे नमूद केले आहे.**

आणि ज्याअर्थी, या नोटीसव्दारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे.

त्या अर्थी, या अनुसुचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरुपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय, बी.एस.एन.एल. बिल्डिंग, १ ला मजला, शिवाजीनगर पोस्ट ऑफिस शेजारी, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ यांच्याकडे सादर करण्यास फर्माविण्यात येत आहे. अशा सुचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|
| स.नं.१६०+१५९अ, गोसावी वस्ती, कोथरुड, पुणे | ४५२२७.३१६ चौ. मी. (दाखल प्रस्तावानुसार) | **पुर्वेस** - स.नं.१६७/२<br>**पश्चिमेस** - स.नं.१६७ (पैकी)<br>**उत्तरेस** - स.नं.१६६<br>**दक्षिणेस** - स.नं.१६७, १६८ (पैकी) | मे.जी.एम. गुलाब भक्ती एंटरप्रायजेस १०३, संगीता एनक्लेव्ह, सर्वोदयानगर, दत्त मंदिर समोर, नहुर रोड, मुलुंड (पुर्व), मुंबई - ४०००८० |

सदरची नोटिस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

**(पांडूरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक -०४/०२/२०१९

suchana as per 2017 act.docx